P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक - ०७/१२/२०२३

## दि.०६/१२/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ६३२/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम- १३(१)(ई) सह १३ (२) व भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सुधारणा कायदा-२०१८ चे कलम- १३(१)(ब) सह १३ (२) प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | सन १९८६ ते २५/१२/२०२१ पर्यंत कल्पतरु,गांगार्डे नगर,सुदर्शन हॉस्पिटल समोर,पिंपळे गुरव,पुणे (आरोपीचे राहते घर) |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/१२/२०२३ रोजी ११ / २३ वा |
| फिर्यादी | :- | श्रीराम विष्णु शिंदे वय-३८ वर्ष, धंदा - नोकरी, पद - पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिट |
| आरोपी | :- | तुकाराम नामदेव सुपे वय-५९ वर्षे पद- तत्कालीन शिक्षणाधिकारी, माध्यमिक, जि.प.पुणे (सध्या सेवा निवृत्त) रा.कल्पतरु,<br>गांगार्डे नगर,सुदर्शन हॉस्पिटल समोर,पिंपळे गुरव,पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी लोकसेवक तुकाराम नामदेव सुपे यांचे विरुध्द सायबर पो.स्टे पुणे गु.र.नं ५६/२०२१ भा.द.वि.४०६,४०९,४२०,४६५,४६७,४६८,३४ सह आय.टी. ॲक्ट कलम- ६६(डी) त्या गुन्ह्याबाबत फिर्यादी यांनी सायबर पो.स्टे पुणे शहर यांचेकडुन माहीती प्राप्त करुन घेतली असता त्यांचेकडुन प्राप्त झालेल्या कागद पत्राचे अवलोकन केले असता सायबर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या नमुद गुन्ह्यात तुकाराम सुपे यांचेकडुन नमुद गुन्ह्याच्या तपासादरम्यान ०२,८७,९९,५९०/- रुपये (दोन कोटी सत्याएंशी लाख नव्यान्नव हजार पाचसे नव्वद रुपये) रोख रक्कम व १४५ तोळे सोने किंमत अंदाजे ७२,००,०००/-(बाहात्तर लाख) रुपये अशी एकुण-०३,५९,९९,५९०/-रु एवढी मालमत्ता मिळुन आली असुन तपासादरम्यान जप्त करण्यात आलेली मालमत्ता ही भ्रष्ट मार्गाने धारण केलेली अपसंपदा असुन ती त्यांच्या सेवाकालावधीतील वैध उत्पन्नापेक्षा अधिक असल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मा.पोलीस उप अधिक्षक माधुरी भोसले ला.लु.प्र.विभाग पुणे ९८२३०३००९३ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी १३६८/२०२३ भादवि क.१४३,१४४, १४७,१४८,१४९,५०४,५०६ (२),५०९,४२७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.५/१२/२०२३ रोजी ११.३० वाजण्याच्या सुमारास व दि.६/१२/२०२३ रोजी १३.५० वाजण्याच्या सुमारास .पारखे वस्ती,सव्हे नं.४३/३/२ वाकड हिंजवडी रोड मधुबन हॉटेलच्या पाठीमागे वाकड |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/१२/२०२३ रोजी १९.३२ वा. |
| फिर्यादी | :- | **महीला फिर्यादी** |
| आरोपी | :- | १)सुरेश हरिभाउ भुजबळ २) मयुर सुरेश भुजबळ ३) महेश सुरेश भुजबळ ४) महीला आरोपी ५) महीला आरोपी ६) तेजल मयुर भुजबळ ७) महीला आरोपी व तिची मुलगी रा. वाकड हिंजवडी रोड मधुबन हॉटेलच्या पाठीमागे वाकड **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी लोखंडी कटरच्या साहाय्याने फिर्यादी यांचे तारेचे कंपाऊड कापुन तोडुन लोखंडी बार, लोखंडी तारा हया कोठेतरी फेकुन देवुन त्याचे नुकसान केले व फिर्यादी याचे घराचे दक्षिणेला आरोपी क्र.२ याने लोखंडी गेट लावुन फिर्यादी व त्यांच्या कुटूबियांना येणेजाणेसाठी असलेला रस्ता बंद केलेला होता ते गेट तोडुन आरोपी क्र.१ ते ७ यांनी सर्वानी एकत्र येवुन त्यापैकी आरोपी .१ याने त्याच्या हातात लोखंडी कु-हाड घेवुन आरोपी क्र.२ व ३ यांनी हातात लाकडी बांबु घेवुन फिर्यादी यांच्या जागेमध्ये बेकायदेशीरपणे प्रवेश करून घराचे अंगणात असलेली आरोपी क्र.१ ते ३ यांनी एकुण पाच आंब्याची रोपटे |

उपटुन टाकुन, लोखंडी तार, लोंखडी बोर्ड तोडुन तो ओढयामध्ये फेकुन देवुन आरोपी क्र.१ यांनी हातात लोखंडी कु-हाड घेवुन “ तुझ्या घरामधील एक माणुस आज संपवितो, त्याशिवाय हे संपणार नाही, कुत्रे तु बाहेर ये तुला तोडतोच ” असे म्हणुन फिर्यादी यांना शिवीगाळ करून त्यांना व त्यांच्या कुटूबियांना आरोपी क्र.१ यांनी हातात कु-हाड घेवुन जीवे मारून टाकण्याची धमकी दिलेली असुन फिर्यादी यांना सार्वजनिक ठिकाणी कुत्रे असे व तोंडाने वाईट वाईट अश्लिल शिवीगाळ करुन अपमानकारक शब्दप्रयोग उच्चारलेला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि काकडे ९९७५७७२४६४

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी - ७१९/२०२३, भा.द.वि.कलम ३२४,३२३,३४ आर्म ॲक्ट ४(२५) महाराष्ट्र पोलीस अधि कलम ३७ (१) (३),१३५ प्रमाण

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०५/१२/२०२३ रोजी ११.४५ वा चे सुमारास लालाबहादुर शास्त्री मार्ग,म्हाळसाकांत चौक आकुर्डी पुणे

गुन्हा दाखल :- दि ०६/१२/२०२३ रोजी ००/५८ वा

फिर्यादी :- अल्पवयीन मुलगा

आरोपी :- १)शिवानी डोंगरे रा.चिखली पुणे
२)सुजल पवार, रा.घरकुल चिखली पुणे
३)सुमित कांबळे रा.घरकुल चिखली पुणे
४)एक अनोळखी मुलगा
**आरोपी क्र.२ अटक आहे**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व फिर्यादीचा मित्र ओंमकार नवनाथ नरवडे असे आम्ही दोघे लालबहादुर शास्त्री मार्ग म्हाळसाकांत चौक आकुर्डी पुणे येथे फिर्यादीचे गाडीतील पेट्रोल संपल्यामुळे थांबलो असता फिर्यादीचे ओळखीची आरोपी क्र.१ हिस महिन्यापुर्वी फिर्यादी उलट बोलल्याचा राग मनात धरुन तिने तिच्या चारचाकी वाहनातुन येवुन त्यातील आरोपी क्र.२ व ३ दोघे रा.घरकुल चिखली पुणे व आणखी एक अनोळखी मुलगा यांनी माझे बहिणीला उलट काय बोलला असे म्हणुन आरोपी क्र.२ व ३ यांनी फिर्यादीला हातावर पाठीवर कोयत्यानी मारहाण करुन अनोळखी मुलाने चापट मारुन किरकोळ दुखापत केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा कोळी ८८८८०५८८११

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ७८४/२०२३ भादवि कलम २७९, ३०४ (अ),४२७ मो.व्हि.ॲक्ट कलम १८४,१८१, ११९/१७७

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/०८/२०२३ रोजी १७/३० वा चे सुमारास महादेव मंदिर समोर, चेरी चौकांकडुन एचडीएफसी कॉलनीकडे जाणारे रोडवर शाहुनगर चिंचवड पुणे

गुन्हा दाखल :- दि.०६/१२/२०२३ रोजी २३/५५ वा

फिर्यादी :- सचिन कैलासचंद लोहाडे, वय ४५ वर्षे, धंदा- नोकरी रा.यशोदीप रेसीडन्सी फ्लॅट नं. १० ए/१०२ शाहुनगर, चिचंवड पुणे

आरोपी :- **विधीसंघर्षीत बालक**
**आरोपी मयत आहे**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे सोसायटीतील मुलगा सोहम नंदकुमार पटुळे वय १७ वर्षे याचेकडे कोणताही वाहन चालविण्याचा परवाना नसताना त्याचेकडील स्पोर्ट बाईक यमाह आर-१५ नं. एम.एच.१४ के.एक्स.१६७२ हिचेवर फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा वय १३ वर्षे यास बसवुन सदरची मो.सायकल ही चेरी चौकाकडुन शाहुनगर चिंचवड या रोडवर चालवित असताना त्यांनी रस्त्याचे परिस्थतीकडे दुर्लक्ष करुन, निष्काळजीपणे व हायगयीने भरधाव वेगाने चालविल्याने त्याचा मोटार सायकलवरील ताबा सुटल्याने सदरची मो.सायकल ही भरधाव वेगाने रस्त्याचे कडेला असलेल्या झाडवर जोरात धडकल्याने त्यात सोहम नंदकुमार पटुळे याचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाला तसेच पाठीमागे बसलेला फिर्यादीचा मुलगा अक्षत सचिन लोहड याचे ही डोक्यास गंभीर दुखापत करुन उपचारदरम्यान त्याचा मृत्यु झाला असुन त्याचे ही मरणास सोहम पटुळे हा कारणीभुत होवुन मो.सायकलचे नुकसान केले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि न्यामणे ९९२३४५५१११

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ९८३/२०२३, भा.द.वि.कलम ४२०,४६५, ४६८,४७१,४७३,३४ व आधार कायदा २०१६ चे कलम ३६ व ४२ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | मागील सुमारे दोन ते तीन वर्षापासुन ते आज दिनांक ०६/१२/२०२३ रोजी पर्यंत कृष्णा झेरॉक्स व स्टेशनरी, पुणे नाशिक हायवे लगत भोसरी येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/१२/२०२३ रोजी २३/ २२ वा. |
| फिर्यादी | :- | शामवीर नामदेव गायकवाड, वय ५५ वर्ष, श्रेणी पोलीस उप निरीक्षक, नेमणुक द.वि.शा, विशेष शाखा, पिंपरी चिंचवड, |
| आरोपी | :- | १)शिवराज प्रकाश चांभारे(कांबळे), वय ४० वर्ष, रा. स.न. १७ साई आनंदनगर धावडेवस्ती भोसरी पुणे ३९<br>२)महीला आरोपी वय ३६वर्ष, रा.सदर<br>३)धोंडीबा प्रकाश शेवाळकर, वय २४ वर्ष, रा. सदर,<br>४)गणेश रामदास यंगड, वय २३ वर्ष, रा. सुरेश तात्या आल्हाट चाळ,आल्हाटवाडी मोशी, पुणे<br>**आरोपी अटक आहेत** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र.१ व २ हे आधारकार्ड मध्ये बदल करण्यास अधिकृत व्यक्ती नसल्याचे स्वतःस माहीत असताना सुध्दा लोंकाना ते अधिकृत आधारकार्ड सेवा केंद्र चालक असल्याचे भासवुन लोकांची बनावट कागदपत्रे तयार करुन आधारकार्ड मध्ये तसेच इतर शासकीय कागपत्रांमध्ये त्यांचे कामगारांचे मदतीने अनधिकृतपणे बदल करुन शासनाची फसवणुक करत असल्याचे आढळुन आले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गायकवाड ९५५२५४६१३१ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ११७९/२०२३ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),२०(ब) (ii)(ब), प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/१२/२०२३ रोजी १४.४० वा. पिंपरी पोलीस स्टेशनचे हद्दीतील गोलमंडई मार्केट समोर व मुख्य अग्निशमन केंद्रा समोर, वल्लभनगर रोड, संततुकारामनगर, पिंपरी पुणे येथे रोडचे कडेला |
| गुन्हा दाखल | :- | दि.६/१२/२०२३ रोजी१९.५५ वा. |
| फिर्यादी | :- | कपिलेश कृष्णा इगवे, वय ३३ वर्षे, पोलीस शिपाई, ब. नं. २७१२, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| आरोपी | :- | जितेंद्र मगन कोळी वय ३३ वर्षे रा. इसाळ ता.शिरपुर जि.धुळे<br>**आरोपी अटक आह** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने त्याचे कब्जात एकुण ७,५८,८००/- रु. किं. चा माल त्यामध्ये एकुण ७,४३,८००/- रु. किं.चा ०७ किलो ४३८ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व १५,०००/- रु. किं.चा मोबाईलसह गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्री करीता कब्जात बाळगताना मिळुन आला. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि सावर्डे ८८८८०२९९९१ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ७८३/२०२३ शस्त्र अधिनियम कलम ३(२५) सह महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१)/ १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.६/१२/२०२३ रोजी १८.३० वा. चे सुमारास साने चौक, भिसे वाईन समोरील मोकळया मैदानात, चिखली, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.६/१२/२०२३ रोजी २२/२९ वा |
| फिर्यादी | :- | अजित बापु रुपनवर, पोलीस शिपाई ,बक्कल नंबर २८१०, नेमणुक - गुन्हे शाखा, युनिट १, पिंपरी-चिंचवड |
| आरोपी | :- | संगमेश्वर ऊर्फ पप्पू गंगाधर येवते वय ३४ वर्षे रा. आकुर्डी चौक, खंडोबा मंदीर शेजारी राजु पठाण यांच्या रुममध्ये भाडयाने आकुर्डी पुणे |

| | | |
|---|---|---|
| | | आरोपी अटक आहेत |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने आपले कब्जामध्ये १ देशी बनावटीचे पिस्तुल व १ जिवंत काडतुस असे एकुण कि.रू २१,०००/-रु की चे साहित्य विनापरवाना बेकायदेशीर रित्या अनाधिकारने आपले जवळ बाळगले असताना मिळुन आला.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा मुळीक ७९७२५५८७४१ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ११७०/२०२३ भादंवि कलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०३/१२/२०२३ रोजी ०७.३० वा चे सुमारास साईबा टी सेंन्टर समोर, काळेवाडी फाटा, काळेवाडी, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/१२/२०२३ रोजी २१/२० वा |
| फिर्यादी | :- | प्रविण शिवाजी शितोळे वय ४० वर्षे धंदा- ड्रायव्हर रा. ओमसाई व्हिला, फ्लॅट नं. ३०२, कन्हैय्या सोसायटी, मोरेवस्ती, चिखली पुणे. |
| आरोपी | :- | चुनाराम विरंबजी चौधरी वय ४२ वर्षे रा. भाऊ घिसाराम चौधरी याची रुम, जयदीप मेडिकल, नखातेनगर, थेरगांव, पुणे.<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची ७०,०००/- रु किं ची, एक पांढरे क्रीम रंगाची, सुझुकी ॲक्सेस मोपेड मो. सायकल.ही नमुद ठिकाणी फिर्यादी यांनी लॉक व पार्क करुन ठेवली असता ति नमुद आरोपी याने चोरुन नेली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मेटे ९४०५१२११५३ |